# परिशिष्ट – अ

## राजे यशवंतराव होळकर महामेष योजना सन २०२२-२३ मध्ये राबविणे बाबत मार्गदर्शक सूचना

(अ) शासन निर्णय क्रमांक - पविआ-१०१७/ प्र. क्र. ६५/ पदुम-३ दिनांक- ०२/०६/२०१७ नुसार, राजे यशवंतराव होळकर महामेष योजना या नावाने ६ मुख्य घटकांसह नवीन योजना सन २०१७-१८ या आर्थिक वर्षापासून राज्यातील मुंबई व मुंबई उपनगर हे २ जिल्हे वगळता उर्वरित ३४ जिल्ह्यात राबविणेकरिता मान्यता देण्यात आलेली आहे.

(ब)सदर योजनेसाठी प्राप्त झालेल्या निधीमधून नवीन लाभधारक निवड प्रक्रिया राबवून लाभधारक निवड करावयाचे आहे. या करिता ऑनलाइन पद्धतीने अर्ज मागविण्याची प्रक्रिया राबविणे, त्यानुसार लाभधारक निवड प्रक्रिया राबविणे तसेच योजनेची अंमलबजावणी करावयाच्या कार्यवाही बाबत खालीलप्रमाणे नियमावली निर्गमित करण्यात येत आहे:-

1. सदर योजना केवळ भटक्या जमाती (भज-क) या प्रवर्गातील लाभार्थ्यांना लागू असून या योजनेमध्ये खालील ६ मुख्य घटकांचा समावेश करण्यात आलेला आहे.

(1) स्थायी आणि स्थलांतरित मेंढीपालन करणाऱ्या मेंढीपालकांना पायाभूत सोई - सुविधेसह २० मेंढया + १ मेंढानर अशा मेंढीगटाचे ७५% अनुदानावर वाटप करणे

(2) सुधारित प्रजातींच्या नर मेंढ्यांचे ७५% अनुदानावर वाटप करणे (केवळ या योजने अंतर्गत वरील मेंढी गट योजनेचे लाभार्थी नसलेल्या परंतु ज्यांच्याकडे स्वत:च्या मेंढ्या आहेत अशा लाभार्थींकरिता)

(3) मेंढी पालनासाठी पायाभूत सोई-सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी ७५% अनुदान. ( केवळ या योजने अंतर्गत वरील मेंढी गट योजनेचे लाभार्थी नसलेल्या परंतु ज्यांच्याकडे स्वत:च्या मेंढ्या आहेत अशा लाभार्थींकरिता)

(4) मेंढी पालनासाठी संतुलित खाद्य उपलब्ध करून देण्यासाठी ७५% अनुदान. (केवळ या योजने अंतर्गत वरील मेंढी गट योजनेचे लाभार्थी नसलेल्या परंतु ज्यांच्याकडे स्वत:च्या मेंढ्या आहेत अशा लाभार्थींकरिता)

(5) कुट्टी केलेल्या हिरव्या चाऱ्याचा मुरघास करण्याकरिता गासड्या बांधण्याचे यंत्र (Mini Silage Baler Cum Wrapper) खरेदी करण्यासाठी ५०% अनुदान.

(6) पशुखाद्य कारखाने उभारण्यासाठी ५०% अनुदान.

वरील प्रमाणे एकूण ६ घटकामध्ये उपघटकांचा समावेश करण्यात आलेला आहे,

| मुख्य घटक क्रमांक | उप घटक क्रमांक | घटकाचे नाव | गटाची एकूण किंमत (रु.) | लाभधारक हिस्सा २५% (रु.) | शासन अनुदान ७५% (रु) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 1 | कायमस्वरूपी एका ठिकाणी राहून मेंढीपालन करण्याकरिता पायाभूत सोई -सुविधेसह २० मेंढया + १ मेंढानर असा मेंढीगट ७५% अनुदानावर वाटप करणे (स्थायी) | 3,33,000/- | 83,250/- | 2,49,750/- |
| | 2 | स्थलांतर पद्धतीने मेंढीपालन करण्याकरिता पायाभूत सोई – सुविधेसह २० मेंढया + १ मेंढानर असा मेंढीगट ७५% अनुदानावर वाटप करणे (स्थलांतरीत) | 2,02,500/- | 50,625/- | 1,51,875/- |
| 2 | 3 | ज्यांच्याकडे स्वत:चे २० किंवा त्यापेक्षा अधिक परंतु ४० पेक्षा कमी मेंढया आहेत अशा लाभार्थ्यांना सुधारित प्रजातीचा १ नरमेंढा ७५% अनुदानावर वाटप करणे. | रु. 10,000/- प्रती मेंढानर | रु. 2500/- प्रती मेंढानर | रु. 7,500/- प्रती नरमेंढा |
| | 4 | ज्यांच्याकडे स्वत:चे ४० किंवा त्यापेक्षा अधिक परंतु ६० पेक्षा कमी मेंढया आहेत अशा लाभार्थ्यांना सुधारित प्रजातीचे २ नरमेंढे ७५% अनुदानावर वाटप करणे. | | | |
| | 5 | ज्यांच्याकडे स्वत:चे ६० किंवा त्यापेक्षा अधिक परंतु ८० पेक्षा कमी मेंढया आहेत अशा लाभार्थ्यांना सुधारित प्रजातीचे ३ नरमेंढे ७५% अनुदानावर वाटप करणे. | | | |
| | 6 | ज्यांच्याकडे स्वत:चे ८० किंवा त्यापेक्षा अधिक परंतु १०० पेक्षा कमी मेंढया आहेत अशा लाभार्थ्यांना सुधारित प्रजातीचे ४ नरमेंढे ७५% अनुदानावर वाटप करणे. | | | |
| | 7 | ज्यांच्याकडे स्वत:चे १०० किंवा त्यापेक्षा अधिक मेंढया आहेत अशा लाभार्थ्यांना सुधारित प्रजातीचे ५ नरमेंढे ७५% अनुदानावर वाटप करणे. | | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 3 | 8 | ज्यांच्याकडे स्वत: च्या २० मेंढया व १ मेंढानर अशा एकूण २१ मेंढया किंवा त्यापेक्षा अधिक परंतु ४० मेंढ्यापेक्षा कमी अशा मेंढ्यांच्या एका ठिकाणी राहून स्थायी स्वरूपाचे मेंढी पालनासाठी पायाभूत सोई-सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी ७५% अनुदान वाटप (स्थायी) | 1,63,000/- | 40,750/- | 1,22,250 |
| | 9 | ज्यांच्याकडे स्वत: च्या २० मेंढया व १ मेंढानर अशा एकूण २१ मेंढया किंवा त्यापेक्षा अधिक परंतु ४० मेंढ्यापेक्षा कमी अशा मेंढ्यांच्या स्थलांतरीत स्वरूपाचे मेंढी पालनासाठी पायाभूत सोई-सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी ७५% अनुदान वाटप (स्थलांतरीत) | 32,500/- | 8,125/- | 24,375 |
| | 10 | ज्यांच्याकडे स्वत: च्या ४० मेंढया व २ मेंढानर अशा एकूण ४२ मेंढया किंवा त्यापेक्षा अधिक अशा मेंढ्यांच्या एका ठिकाणी राहून स्थायी स्वरूपाचे मेंढी पालनासाठी पायाभूत सोई-सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी ७५% अनुदान वाटप (स्थायी) | 3,17,000/- | 79,250/- | 2,37,750 |
| | 11 | ज्यांच्याकडे स्वत: च्या ४० मेंढया व २ मेंढानर अशा एकूण ४२ मेंढया किंवा त्यापेक्षा अधिक अशा मेंढ्यांच्या स्थलांतरीत स्वरूपाचे मेंढी पालनासाठी पायाभूत सोई-सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी ७५% अनुदान वाटप (स्थलांतरीत) | 48,000/- | 12,000/- | 36,000 |
| 4 | 12 | एका ठिकाणी राहून स्थायी स्वरूपाचे मेंढी पालनासाठी संतुलित खाद्य उपलब्ध करून देण्यासाठी ७५% अनुदान वाटप (स्थायी) (१०० ग्रॅम प्रती दिन प्रती मेंढी याप्रमाणे माहे एप्रिल ते जुलै या ४ महिन्याच्या कालावधी करिता) | रु. 25/- प्रती किलो | रु. 6.25/- प्रती किलो | रु. 18.75 प्रती किलो |
| | 13 | भटकंती करणारे स्थलांतरीत स्वरूपाच्या मेंढी पालनासाठी संतुलित खाद्य उपलब्ध करून देण्यासाठी ७५% अनुदान वाटप (स्थलांतरीत) (१०० ग्रॅम प्रती दिन प्रती मेंढी याप्रमाणे जून ते जुलै या २ महिन्याच्या कालावधी करिता ) | रु. 25/- प्रती किलो | रु. 6.25/- प्रती किलो | रु. 18.75 प्रती किलो |
| 5 | 14 | कुट्टी केलेल्या हिरव्या चाऱ्याचा मुरघास करण्याकरिता गासड्या बांधण्याचे यंत्र (Mini Silage Baler Cum Wrapper) खरेदी करण्यासाठी ५०% अनुदान वाटप | रु. 8.00 लक्ष | रु. 4.00 लक्ष | रु. 4.00 लक्ष (50% अनुदान) |
| 6 | 15 | पशुखाद्य कारखाने उभारण्यासाठी ५०% अनुदान वाटप | रु. 10.00 लक्ष | रु. 5.00 लक्ष | रु. 5.00 लक्ष (50% अनुदान) |

***घटक निहाय व बाब निहाय खर्चाचा तपशील सोबत जोडण्यात आलेल्या विवरणपत्र क्रमांक १ ते ११ मध्ये दर्शविण्यात आलेला आहे.***

## २. योजना राबविण्याचे कार्यक्षेत्र

1. सदर योजना केवळ भटक्या जमाती (भज-क) या प्रवर्गातील लाभार्थीसाठी लागू राहील.
2. सदरची योजना राज्यातील मुंबई व मुंबई उपनगर हे २ जिल्हे वगळता उर्वरित ३४ जिल्ह्यांमध्ये राबविण्यात यावी.
3. योजनेअंतर्गत लाभधारक निवड करिता मागविण्यात आलेल्या अर्जापोटी प्राप्त झालेला प्रतिसाद विचारात घेऊन जिल्हा निहाय उधिष्ट निश्चित करून संबंधित क्षेत्रीय अधिकाऱ्यांना कळविण्यात येईल.

## ३. लाभार्थी निवडीचे निकष/ अटी व शर्ती

1. सदर योजना केवळ भटक्या जमाती (भज-क) या प्रवर्गातील लाभार्थ्यांना लागू असेल.
2. लाभधारकाचे वय १८ वर्षापेक्षा कमी व ६० वर्षापेक्षा जास्त नसावे.
3. लाभधारकांची निवड करताना, महिलांकरिता ३०% व अपंगांकरिता ३% आरक्षण देण्यात यावे.
4. या योजने अंतर्गत भटक्या जमाती (भज - क) प्रवर्गातील बचत गटांना / पशुपालक उत्पादक कंपन्याना लाभार्थी म्हणून प्राधान्य देण्यात येईल.
5. लाभार्थ्यास आधार कार्ड सोबत संलग्न करण्यात यावे.

6. ज्या लाभधारकांना या आधी महामेष योजनेअंतर्गत लाभ मिळालेला आहे अशा लाभधारकांना यामध्ये पुन्हा अर्ज करता येणार नाही.
7. पशुसंवर्धन विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनेअंतर्गत गेल्या ३ वर्षामध्ये लाभ घेतलेल्या व्यक्तीस किंवा कुटुंबातील व्यक्तीस या योजनेअंतर्गत पुन्हा अर्ज करता येणार नाही.
8. एका कुटुंबातील एकाच व्यक्तीस अर्ज करता येईल.
9. स्थायी पद्धतीने मेंढी पालन करणाऱ्या लाभार्थ्यांना शेड बांधण्याकरिता स्वत: ची जागा असणे आवश्यक आहे.
10. अर्जदार किंवा अर्जदाराच्या कुटुंबातील सदस्य शासकीय / निमशासकीय / स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सेवेत किंवा सेवानिवृत्ती वेतनधारक / शासकीय पदाचा लाभ घेणारा, तसेच राज्य, केंद्र शासन / स्थानिक स्वराज्य संस्थेचे सदस्य / पदाधिकारी/ लोकप्रतींनिधी नसावा.
11. घटक निहाय प्राप्त अर्ज विचारात घेऊन उधिष्ट महामंडळामार्फत निश्चित करण्यात यावे.

## ४. <u>अर्ज करण्याबाबतची अर्जदारांनी करावयाची कार्यवाही –</u>

योजनेअंतर्गत अर्जदारास फक्त ऑनलाइन पद्धतीने अर्ज सादर करावयाचे आहे. कोणत्याही परिस्थितीमध्ये ऑफलाइन किंवा इतर कोणत्याही मार्गाने अर्ज करता येणार नाही. ऑनलाइन पद्धतीने www.mahamesh.in या महामंडळाचे संकेतस्थळावरून किंवा **Android** मोबाइल द्वारे **MAHAMESH" App** वापरुन अर्ज करता येईल.

### <u>i. महामेष वेबसाइट वरून अर्ज करण्याची पध्दत -</u>

१. अर्जदारांनी योजनेचा अर्ज ऑनलाइन भरावयाचा आहे. त्यासोबत कोणतेही कागदपत्रे अपलोड करावयाची नसून संगणकीय सॉफ्टवेअरव्दारे random पद्धतीने (लॉटरी) निवड झाल्यानंतर दिलेल्या विहित कालावधीत विहित केलेली कागदपत्रे विहित वेळेत ऑनलाइन अपलोड करावयाची आहे.
२. अर्जदारांनी अर्ज करण्याकरिता www.mahamesh.in हे महामंडळाचे संकेतस्थळ ओपन करावयाचे आहे.
३. अर्ज भरण्याकरिता अर्जदारांनी प्रथम वरील संकेतस्थळावर जाऊन <u>महामेष योजनेची लिंक ओपन</u> करावी.
४. अर्ज भरण्याबाबतची माहिती दर्शविणारा **<u>व्हिडिओ व युजर म्यान्युयल</u>** बाबतची लिंक संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येईल, अर्जदारांनी अर्ज भरण्यापूर्वी याबाबतची माहिती काळजीपूर्वक बघून व वाचून त्याप्रमाणे अर्ज भरण्यात यावा.
५. अर्जदारांनी प्रथम स्वत:चा आधार नंबर वापरुन लॉगिन (अर्जदार लॉगिन) करावयाचे आहे. <u>(एका अर्जाकरिता नोंदणी झालेला आधार नंबर परत दुसऱ्या अर्जदाराच्या अर्जाकरिता वापरता येणार नाही)</u>
६. योजनेचा अर्जामध्ये अर्जदारानी वयक्तिक माहिती, जमिनीचा तपशील तसेच इतर माहिती भरावयाची आहे. माहिती व्यवस्थित भरून झाल्यानंतर **<u>NEXT</u>** बटन क्लिक करावयाचे आहे. त्यानंतर दुसरे पेज ओपन होईल, यामध्ये अर्जदारास कुठल्या घटकामध्ये लाभ घ्यावयाचा आहे याबाबतची माहिती भरावयाची आहे.
७. अर्जामधील माहिती भरून झाल्यानंतर **<u>SUBMIT</u>** बटनावर क्लिक करण्यात यावे. <u>(सबमिट करण्याआधी भरलेली माहिती बरोबर असल्याची खात्री करून घ्यावी)</u>
८. अर्ज सबमीट झाल्यानंतर **<u>"Application form is submitted successfully</u>**" असा मेसेज आल्यानंतरच अर्जदाराचा अर्ज सबमिट झाल्याचे समजावे.
९. अर्ज सबमिट झाल्यानंतर अर्जाची पावती व्यवस्थित जतन करून ठेवण्यात यावी.
१०. घटक निहाय प्राप्त अर्ज विचारात घेऊन उधिष्ट महामंडळामार्फत निश्चित करण्यात यावे.

## ii. Android मोबाइलद्वारे MAHAMESH” App वापरुन अर्ज करण्याची पध्दत –

१. अर्ज करण्याकरिता “MAHAMESH” App हे **www.mahamesh.in** या संकेतस्थळावरून किंवा **Google Playstore** वरून Android फोनमध्ये डाउनलोड करून “MAHAMESH” App इन्स्टोल करण्यात यावे.

२. “MAHAMESH” App ओपन करून अर्ज भरण्याबाबतची माहिती दर्शविणारा **व्हिडिओ व युजर म्यान्युयल** बाबतची लिंक उपलब्ध करून देण्यात येईल, अर्जदारांनी अर्ज भरण्यापूर्वी याबाबतची माहिती काळजीपूर्वक बघून व वाचून त्याप्रमाणे अर्ज भरण्यात यावा.

३. अर्जदारानी प्रथम स्वत:चा आधार नंबर वापरुन नोंदणी करावयाची आहे. (एका अर्जाकरिता नोंदणी झालेला आधार नंबर परत दुसऱ्या अर्जदाराच्या अर्जाकरिता वापरता येणार नाही)

४. योजनेचा अर्जामध्ये अर्जदाराची वायक्तिक माहिती, जमिनीचा तपशील तसेच इतर माहिती भरावयाची आहे. तद्नंतर यामध्ये अर्जदारास कुठल्या घटका मध्ये लाभ घ्यावयाचा आहे याबाबतची माहिती भरावयाची आहे.

५. अर्जामधील माहिती भरून झाल्यानंतर **SUBMIT** बटनावर क्लिक करण्यात यावे. (सबमिट करण्याआधी भरलेली माहिती बरोबर असल्याची खात्री करून घ्यावी)

६. अर्ज सबमीट झाल्यानंतर **“Application form is submitted successfully**” असा मेसेज आल्यानंतरच अर्जदाराचा अर्ज सबमिट झाल्याचे समजावे.

७. अर्ज सबमिट झाल्यानंतर अर्जाची पावती व्यवस्थित जतन करून ठेवण्यात यावी.

## III) लाभधारक निवड प्रक्रिया -

१. घटक निहाय प्राप्त अर्ज विचारात घेऊन महामंडळामार्फत उधिष्ट निश्चित करण्यात येईल.

२. महामंडळामार्फत उधिष्ट निश्चित झाल्यानंतर, जिल्हा स्तरीय निवड समितीमार्फत निवड यादी (1 selected + 5 waiting) यानुसार यादृच्छिक (Random) रित्या ऑनलाईन पद्धतीने प्राप्त अर्जामधून लाभधारक निवड करण्यात येईल.

३. यादृच्छिक (Random) पद्धतीने निवड करण्यात आलेल्या अर्जदारांना संकेतस्थळाच्या (**www.mahamesh.in**) माध्यमाद्वारे त्यांच्या नोंदनिकृत भ्रमणध्वनिवर लघु संदेशाव्दारे (SMS) निवड झाल्याबद्दल कळविण्यात येईल.

४. निवड यादीमध्ये उपलब्ध तरतुदीच्या आधीन राहून निश्चित केलेल्या लक्षांकाच्या पाच पट (उपलब्ध व पात्र अर्जास आधीन राहून) अर्जदारांना कागदपत्रे पडताळणी करिता अपलोड करण्याकरिता कळविण्यात येईल.

५. अर्जदारांना आवश्यक कागदपत्रे संकेतस्थळावर उपलोड करण्याकरिता १५ दिवसाचा कालावधी देण्यात येईल.

६. अर्जदारांना आवश्यक कागदपत्राची पूर्तता न केल्यास त्यांना अपात्र ठरविण्यात येईल.

७. निवड यादी महामंडळाच्या संकेतस्थळावर (**www.mahamesh.in**) उपलब्ध असेल.

## iii. निवड झाल्यानंतर अर्जदारांनी करावयाची कार्यवाही –

१. अर्जदारांनी विहित मुदतीत कागदपत्रे www.mahamesh.in या संकेतस्थळावरून किंवा “MAHAMESH” App वरून अपलोड करावयाचे आहे.

२. **आवश्यक कागदपत्राची यादी खालील प्रमाणे आहे.**

- आधार कार्ड
- रेशन कार्ड
- जातीचा दाखला (सक्षम अधिकाऱ्यांचा)
- मेंढी पालन करण्याची पद्धत किंवा स्वरूप व सध्या असलेल्या मेंढ्यांची संख्या (स्थलांतरित /फिरस्ती पद्धतीने किंवा एका ठिकाणी राहून स्थायी पद्धतीने) याबाबतचे संबंधीत पशुवैद्यकीय दवाखान्याचे पशुधन विकास अधिकारी यांचे प्रमाणपत्र (बंधपत्रामधील नमुना क्रमांक १ मध्येच सादर करावयाचा आहे)
- रहिवासी दाखला (सक्षम प्राधिकारी) (बंधपत्रामधील नमुना क्रमांक २ मध्येच सादर करावयाचा आहे)
- अपत्य दाखला (बंधपत्रामधील नमुना क्रमांक ३ मध्येच सादर करावयाचा आहे). १ मे २००१ नंतर तिसरे हयात अपत्य नसावे.
- अर्जदाराचे शेतजमिनीचा अलीकडील तीन महिन्यातील ७/१२ उतारा किंवा अर्जदाराच्या नावे जमीन नसल्यास (कुटुंबियांपैकी) संमतीपत्र देणाऱ्या व्यक्तीच्या नावाच्या शेतजमिनीचा ७/१२ उतारा व १०० रुपयाच्या स्टॅम्प पेपरवर संमतीपत्र (बंधपत्रामधील नमुना क्रमांक ४ मध्येच सादर करावयाचा आहे).
- भाडेतत्वावर शेतजमीन घेतली असल्यास शेतजमीन मालकासमवेत केलेल्या भाडेकराराची सत्यप्रत (रु.१००/- स्टॅम्प पेपर वर नोटरी करून) (बंधपत्रामधील नमुना क्रमांक ५ मध्येच सादर करावयाचा आहे)
- शेड बांधकामाचा लाभ घ्यावयाचा असल्यास, त्यासाठी स्वत:ची किमान १ गुंठा जागा उपलब्ध असल्याबाबत अलीकडील तीन महिन्यातील ७/१२ उतारा / मिळकत दाखला
- बचतगटाचे सदस्य असल्याचे प्रमाणपत्र (लागू असल्यास)
- पशुपालक उत्पादक कंपनीचे सदस्य असल्याचे प्रमाणपत्र (लागू असल्यास)
- अपंगत्व प्रमाणपत्र (लागू असल्यास)
- महामंडळामार्फत शेळी मेंढी पालनाचे प्रशिक्षण घेतले असल्यास त्याबाबतचे प्रमाणपत्र
- स्वयंमघोषणा पत्र (बंधपत्रामधील नमुना क्रमांक ६ मध्येच सादर करावयाचा आहे)

३. वरील प्रमाणे सर्व कागदपत्रे (लागू असणारे) एकाचवेळी अपलोड करून, SUBMIT बटन क्लिक करावे.

४. अर्जदारांनी विहित मुदतीत आवश्यक लागणारे सर्व कागदपत्रे अपलोड न केल्याने अर्जदाराची निवड रद्द झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी अर्जदाराची राहील याबाबत अर्जदाराची कसलीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

लाभधारक निवड करताना खालील बाबी विचारात घेऊन, त्याकरिता प्रत्येक घटकनिहाय स्वतंत्र लाभधारक निवडण्यात यावेत. सदर योजनेअंतर्गत लाभधारकास खालील १५ उपघटकामध्ये लाभ घेता येईल. तथापि,

- अर्जदाराने खालील **पहिल्या दोन** उपघटकामधील कोणत्याही एका उपघटकाचा लाभ घेतल्यास त्यांना इतर उपघटकांमध्ये लाभ घेता येणार नाही.
- अर्जदाराने वरील **३ ते ७ या उपघटकांमधील** कोणत्याही एका उपघटकाचा लाभ घेतल्यास त्यांना पहिले २ उपघटक वगळता उर्वरित उपघटकांमधील मेंढीपालन व्यवसाय करण्याच्या प्रकारानुसार (स्थायी किंवा स्थलांतरित) व सध्या असलेल्या मेंढ्यांच्या संख्येनुसार वरीलप्रमाणे दर्शविण्यात आलेल्या **उपघटक क्रमांक ८ ते ११ मधील कोणत्याही एका** उपघटकाचा लाभ घेता येईल, तसेच **१२ व १३ मधील कोणत्याही एका** उपघटकाचा लाभ घेता येईल.
- अर्जदारास उपघटक क्र. **१४ व १५** या दोन पैकी एका घटकांमध्ये लाभ घेता येईल.
-

| | |
|---|---|
| १ | कायमस्वरूपी एका ठिकाणी राहून मेंढीपालन करण्याकरिता पायाभूत सोई – सुविधेसह २० मेंढया + १ मेंढानर असा मेंढीगट ७५% अनुदानावर वाटप करणे **(स्थायी)** |
| २ | स्थलांतर पद्धतीने मेंढीपालन करण्याकरिता पायाभूत सोई – सुविधेसह २० मेंढया + १ मेंढानर असा मेंढीगट |

| | |
|---|---|
| | ७५% अनुदानावर वाटप करणे **(स्थलांतरीत)** |
| ३ | ज्यांच्याकडे स्वत:चे २० किंवा त्यापेक्षा अधिक परंतु, ४० पेक्षा कमी मेंढया आहेत, अशा लाभार्थ्यांना सुधारित प्रजातीचा १ नरमेंढा ७५% अनुदानावर वाटप करणे. |
| ४ | ज्यांच्याकडे स्वत:चे ४० किंवा त्यापेक्षा अधिक परंतु, ६० पेक्षा कमी मेंढया आहेत, अशा लाभार्थ्यांना सुधारित प्रजातीचा २ नरमेंढे ७५% अनुदानावर वाटप करणे. |
| ५ | ज्यांच्याकडे स्वत:चे ६० किंवा त्यापेक्षा अधिक परंतु, ८० पेक्षा कमी मेंढया आहेत, अशा लाभार्थ्यांना सुधारित प्रजातीचा ३ नरमेंढे ७५% अनुदानावर वाटप करणे. |
| ६ | ज्यांच्याकडे स्वत:चे ८० किंवा त्यापेक्षा अधिक परंतु, १०० पेक्षा कमी मेंढया आहेत, अशा लाभार्थ्यांना सुधारित प्रजातीचा ४ नरमेंढे ७५% अनुदानावर वाटप करणे. |
| ७ | ज्यांच्याकडे स्वत:चे १०० किंवा त्यापेक्षा अधिक मेंढया आहेत, अशा लाभार्थ्यांना सुधारित प्रजातीचे ५ नरमेंढे ७५% अनुदानावर वाटप करणे. |
| ८ | ज्यांच्याकडे स्वत: च्या २० मेंढया व १ मेंढानर अशा एकूण २१ मेंढया किंवा त्यापेक्षा अधिक परंतु, ४० मेंढ्यापेक्षा कमी अशा मेंढ्यांच्या एका ठिकाणी राहून स्थायी स्वरूपाचे मेंढी पालनासाठी पायाभूत सोई-सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी ७५% अनुदान वाटप **(स्थायी)** |
| ९ | ज्यांच्याकडे स्वत: च्या २० मेंढया व १ मेंढानर अशा एकूण २१ मेंढया किंवा त्यापेक्षा अधिक परंतु, ४० मेंढ्यापेक्षा कमी अशा मेंढ्यांच्या स्थलांतरीत स्वरूपाचे मेंढी पालनासाठी पायाभूत सोई-सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी ७५% अनुदान वाटप **(स्थलांतरीत)** |
| १० | ज्यांच्याकडे स्वत: च्या ४० मेंढया व २ मेंढानर अशा एकूण ४२ मेंढया किंवा त्यापेक्षा अधिक अशा मेंढ्यांच्या एका ठिकाणी राहून स्थायी स्वरूपाचे मेंढी पालनासाठी पायाभूत सोई-सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी ७५% अनुदान वाटप **(स्थायी)** |
| ११ | ज्यांच्याकडे स्वत: च्या ४० मेंढया व २ मेंढानर अशा एकूण ४२ मेंढया किंवा त्यापेक्षा अधिक अशा मेंढ्यांच्या स्थलांतरीत स्वरूपाचे मेंढी पालनासाठी पायाभूत सोई-सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी ७५% अनुदान वाटप **(स्थलांतरीत)** |
| १२ | एका ठिकाणी राहून स्थायी स्वरूपाचे मेंढी पालनासाठी संतुलित खाद्य उपलब्ध करून देण्यासाठी ७५% अनुदान वाटप **(स्थायी),**<br>(१०० ग्रॅम प्रती दिन प्रती मेंढी याप्रमाणे माहे एप्रिल ते जुलै या ४ महिन्याच्या कालावधी करिता) |
| १३ | भटकंती करणारे स्थलांतरीत स्वरूपाच्या मेंढी पालनासाठी संतुलित खाद्य उपलब्ध करून देण्यासाठी ७५% अनुदान वाटप **(स्थलांतरीत),**<br>(१०० ग्रॅम प्रती दिन प्रती मेंढी याप्रमाणे जून ते जुलै या २ महिन्याच्या कालावधी करिता ) |

तसेच **"घटक क्रमांक १४ - कुट्टी केलेल्या हिरव्या चाऱ्याचे मुरघास बनविण्याकरिता गासड्या बांधण्याचे यंत्र (Mini Silage Baler Cum Wrapper) खरेदी करण्यासाठी अनुदान"** व **"घटक क्रमांक १५ - पशुखाद्य कारखान्यासाठी अनुदान देणे"**, या घटकाचा लाभ घेण्यासाठी प्राप्त झालेल्या अर्जाची छाननी करण्याची आणि लाभधारकाची निवड करण्याची प्रक्रिया खालीलप्रमाणे गठित समितीमार्फत पूर्ण करण्यात येईल. लाभार्थी निवडीचे निकष शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे राहतील.

१. आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य : अध्यक्ष
२. सह सचिव /उप सचिव (पशुसंवर्धन) : सदस्य
३. व्यवस्थापकीय संचालक, : सदस्य सचिव
पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळ, पुणे

## ६.विविध स्तरावरून ऑनलाइन पद्धतीने अर्जाची छाननी व निवड प्रक्रिया-

योजनेअंतर्गत ऑनलाइन पद्धतीने अर्ज मागविणे तसेच प्राप्त झालेल्या अर्जाची ऑनलाइन पद्धतीने विविध स्तरावरून छाननी करणे व त्याचे रीपोर्ट जेनरेट करणे या बाबतचे सॉफ्टवेअर महामंडळामार्फत तयार करण्यात येईल. त्यानुसार लाभधारक निवड प्रक्रिया राबविण्यात यावी.

महामंडळामार्फत सदर योजनेची राज्यस्तरीय वृत्तपत्रातून प्रसिद्धी करण्यात येईल. अर्जदारास अर्ज सादर करण्याकरिता १५ दिवसाची मुदत देण्यात येईल, प्राप्त अर्ज विचारात घेऊन महामंडळामार्फत लक्षांक निश्चित करण्यात येईल. त्यानंतर शासन निर्णयामधील जिल्हा निवड समितीव्दारे Randam पद्धतीने लाभधारक निवड यादी सॉफ्टवेअरच्या माध्यमातून तयार करण्यात येईल. याकरिता ८ दिवसाची मुदत असेल. त्यानंतर निवड यादीनुसार लाभधारकास लघु संदेशाव्दारे (SMS) आवश्यक कागदपत्रे अपलोड करण्याबाबत कळविण्यात येईल, लाभधारकास कागदपत्रे अपलोड करण्याकरिता १५ दिवसाचा कालावधी देण्यात येईल, तद्नंतर प्राप्त कागदपत्राची व अर्जाची पडताळणी संबंधित पशुधन विकास अधिकारी (विस्तार) यांचेकडून करून शिफारशीसह अर्ज व कागदपत्रे संबंधित जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांचे कडे प्राप्त होतील, याकरिता १० दिवसाचा कालावधी असेल. जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांनी प्राप्त अर्ज व कागदपत्राची पडताळणी करून शिफारशीसह अर्ज जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त यांचे कडे सादर करावयाचे आहे, याकरिता १० दिवसाचा कालावधी असेल. लाभधारकांचे कागदपत्रे योग्य असल्याची खात्री जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त यांचेमार्फत करून निवड समिती मार्फत अंतिम लाभधारक यादी तयार करण्यात येईल, याकरिता १० दिवसाचा कालावधी असेल

अ. **पशुधन विकास अधिकारी (विस्तार) यांनी करावयाची कार्यवाही-**

१. सदर सॉफ्टवेअरची लिंक www.mahamesh.in या महामंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असेल.

२. या योजने अंतर्गत निवड यादीमधील अर्जदारांनी अपलोड केलेले कागदपत्राची पडताळणी करण्याकरिता www.mahamesh.in या महामंडळाच्या संकेतस्थळावर जाऊन **महामेष** योजनेची लिंक ओपन करण्यात यावी.

३. पशुधन विकास अधिकारी (विस्तार) यांचे स्व:तचे लॉगिन आयडी व पासवर्ड संबंधित जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त यांचेकडे उपलब्ध करून देण्यात येईल, त्या पासवर्ड नि लॉगिन केल्यानंतर अर्जदाराची प्राथमिक निवड यादी व स्टेटस दिसेल.

४. अर्जदारांच्या नावासमोर असलेल्या लिंकवर (VIEW APPLICATION) क्लिक केल्यानंतर अर्जदाराचा अर्ज ओपन होईल.

१. त्यानुसार प्रत्येक बाबी समोर अर्जदारांनी आपलोड केलेल्या डॉक्युमेंट ची **“View Document”** अशी लिंक दिसेल. त्यावर क्लिक केल्यानंतर डॉक्युमेंट ओपन होईल, त्यानुसार सदर डॉक्युमेंट नुसार अर्जदारांनी सादर केलेली माहिति बरोबर असल्याची खात्री करून घ्यावी त्याप्रमाणे ती योग्य असल्यास **“Approved”** यावर क्लिक करावे.

२. अर्जदारांनी अपलोड केलेल्या माहिती मध्ये त्रुटि असल्यास **“Not Approved”** यावर क्लिक करून त्यासमोरील टेक्स्ट बॉक्स मध्ये त्याचे कारण नमूद करण्यात यावे.

३. याप्रमाणे संपूर्ण अर्जाची छाननी झाल्यानंतर **Approved** अर्जदाराचा अर्ज पुढे सादर करण्यास पशुधन विकास अधिकारी (विस्तार) यांची शिफारस असल्यास **“Recommended”** या बटनावर क्लिक करावे, किंवा शिफारस नसल्यास त्याबाबतचे कारण नमूद करून **“Not Recommended”** या बटनावर क्लिक करून पुढील कार्यवाही करिता अर्ज सबमीट करण्यात यावा.

४. पशुधन विकास अधिकारी (विस्तार) यांनी सबमीट केलेल्या अर्जाची यादी बघण्याकरिता त्याच पेजवर त्याची लिंक दिसेल, त्यावर क्लिक केल्यानंतर शिफारस करण्यात आलेल्या अर्जदाराची तसेच शिफारस न करण्यात आलेल्या अर्जदाराची स्वंतत्र यादी दिसेल, त्यामध्ये अर्जदाराचे नाव, अर्जक्रमांक व ज्या उपघटकामध्ये अर्जदारांनी अर्ज सादर केलेला आहे त्याचा क्रमांक इ. माहिती दिसेल.

५. **Approved** यादी हिरव्या रंगामध्ये दिसेल, तसेच **Not Approved** केलेल्या लाभधारकाची यादी लाल रंगामध्ये दिसेल. त्याचप्रमाणे ज्या लाभधारकांच्या कागदपत्राची पडताळणी शिल्लक आहे अशी यादी पांढऱ्या रंगामध्ये दिसेल.

**ब. <u>जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांनी करावयाची कार्यवाही -</u>**

१. सदर सॉफ्टवेअरची लिंक www.mahamesh.in या महामंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असेल.

२. या योजने अंतर्गत निवड यादीमधील अर्जदारांनी अपलोड केलेले कागदपत्राची पडताळणी करण्याकरिता www.mahamesh.in या महामंडळाच्या संकेतस्थळावर जाऊन महामेष योजनेची लिंक ओपन करण्यात यावी.

३. जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांचे स्व:तचे लॉगिन आयडी व पासवर्ड संबंधित जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त यांचेकडे उपलब्ध करून देण्यात येतील, त्या पासवर्ड नि लॉगिन केल्यानंतर अर्जदाराची यादी व पशुधन विकास अधिकारी यांनी छाननी करून दिलेले रिमार्क दिसेल.

४. पशुधन विकास अधिकारी (विस्तार) यांनी छाननी केलेल्या अर्जदाराच्या अर्जाची पडताळणी करण्याकरिता अर्जदाराच्या नावासमोर असलेल्या लिंक वर क्लिक केल्यानंतर अर्जदाराचा अर्ज ओपन होईल.

५. त्यानुसार प्रत्येक बाबी समोर अर्जदारांनी अपलोड केलेल्या डॉक्युमेंट ची **"View Document"** अशी लिंक दिसेल. त्यावर क्लिक केल्यानंतर डॉक्युमेंट ओपन होईल, सदर डॉक्युमेंट नुसार अर्जदारांनी सादर केलेली माहिती बरोबर असल्याची खात्री झाल्यास **"Approved"** यावर क्लिक करावे.

६. अर्जदारांनी अपलोड केलेल्या माहिती मध्ये त्रुटि असल्यास **"Not Approved"** यावर क्लिक करावे व त्यासमोरील टेक्स्ट बॉक्स मध्ये त्याचे कारण नमूद करण्यात यावे.

७. या प्रमाणे संपूर्ण अर्जाची पडताळणी झाल्यानंतर अर्जदारचा अर्ज पुढे सादर करण्यास शिफारस असल्यास **"Recommended"** या बटनावर क्लिक करावे, किंवा शिफारस नसल्यास त्याबाबतचे कारण नमूद करून **"Not Recommended"** या बटनावर क्लिक करून अर्ज सबमीट करण्यात यावा.

८. जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांनी सबमीट केलेल्या अर्जाची यादी बघण्याकरिता त्याच पेजवर त्याची लिंक दिसेल, त्यावर क्लिक केल्यानंतर शिफारस करण्यात आलेल्या अर्जदारांची तसेच शिफारस न करण्यात आलेल्या अर्जदारांची स्वंतंत्र यादी दिसेल, त्यामध्ये अर्जदाराचे नाव, अर्जक्रमांक व ज्या उपघटकामध्ये अर्जदारांनी अर्ज सादर केलेला आहे त्याचा क्रमांक इ. माहिती दिसेल.

९. **Approved** यादी हिरव्या रंगामध्ये दिसेल, तसेच **Not Approved** केलेल्या लाभधारकाची यादी लाल रंगामध्ये दिसेल. त्याचप्रमाणे ज्या लाभधारकांच्या कागदपत्राची पडताळणी शिल्लक आहे अशी यादी पांढऱ्या रंगामध्ये दिसेल.

**क. <u>जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त यांनी करावयाची कार्यवाही -</u>**

**a. <u>जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त यांनी अर्जदाराची निवड करावयाची कार्यवाही :-</u>**

१. सदर सॉफ्टवेअरची लिंक www.mahamesh.in या महामंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

२. www.mahamesh.in या महामंडळाच्या संकेतस्थळावर जाऊन महामंडळामार्फत उपलब्ध करून देण्यात आलेल्या लॉगिन आयडी व पासवर्ड व्दारे **महामेष** योजनेची लिंक ओपन करण्यात यावी.

३. लॉगिन करतांना महामंडळामार्फत उपलब्ध करून देण्यात आलेला पासवर्ड बदलणे अनिवार्य आहे.

४. लॉगिन केल्यानंतर योजनेच्या घटक निहाय प्राप्त अर्जाची यादी दिसेल.

५. यादीच्या खाली **"GENERATE RANDOM LIST"** बटन दर्शविण्यात आलेले आहे. सदर निवड करण्याकरिता प्रथम लाभधारक निवड समितीची बैठक नियोजित करण्यात यावी. बैठकीची तारीख व वेळ महामंडळास कळविण्यात यावी त्यावेळे नुसार **"GENERATE RANDOM LIST"** बटन

ॲक्टिवेट होईल. सदर बटन क्लिक केल्यावर जिल्ह्यामध्ये एकुण प्राप्त अर्जामधून घटक निहाय जिल्ह्याच्या एकूण उद्धिष्टाच्या ३ % दिव्यांग व ३०% महिलाच्या अर्जाची यादी प्रथम तयार होईल. त्यानंतर तालुका निहाय व घटक निहाय लाभधारक यादी तयार होईल.

६. प्रतिक्षाधीन यादी तयार करतांना प्रत्येक्ष उपलब्ध तरतुदीच्या आधीन राहून निश्चित केलेल्या लक्षांकांच्या पाच पट (उपलब्ध व पात्र अर्जास अधीन राहून) अर्जदारांना कागदपत्रे पडताळणी करिता कळविण्यात येईल.

७. जिल्हा स्तरीय निवड समितीने Random पद्धतीने निवड केलेल्या अर्जदारांना त्यांच्या नोंदनिकृत भ्रमणध्वनिवर लघु संदेशाद्वारे (SMS) निवड झाल्याबाबत कळविण्यात येईल व विहिती कालावधीत आवश्यक कागदपत्रे अपलोड करण्याबाबत अर्जदारास सूचना दिल्या जातील. (निवड यादी www.mahamesh.in या महामंडळाच्या संकेतस्थळावर तसेच पशुधन विकास अधिकारी (विस्तार) व जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त यांच्या लॉगिन मध्ये उपलब्ध राहील)

**b. <u>जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त यांच्या अध्यक्षतेखालील निवड समितीमार्फत लाभधारकांच्या कागदपत्रांची शहानिशा करून अंतिम निवड यादी तयार करावयाची कार्यवाही :-</u>**

१. जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांनी शिफारस केलेल्या लाभधारकांची अंतिम निवड करण्याकरिता प्राप्त झालेल्या कागदपत्राची शहानिशा करण्यात यावी.

२. याकरिता लॉगिन केल्यानंतर लाभधारकांच्या नावासमोर असलेल्या लिंक वर क्लिक केल्यानंतर लाभधारकाचा अर्ज ओपन होईल.

३. त्यानुसार प्रत्येक बाबी समोर लाभधारकांनी अपलोड केलेल्या डॉक्युमेंट ची **"View Document"** अशी लिंक दिसेल. त्यावर क्लिक केल्यानंतर डॉक्युमेंट ओपन होईल, सदर डॉक्युमेंट नुसार लाभधारकांनी सादर केलेली माहिती बरोबर असल्याची खात्री झाल्यास **"Approved"** यावर क्लिक करावे.

४. लाभधारकांनी अपलोड केलेल्या माहिती मध्ये त्रुटि असल्यास **"Not Approved"** यावर क्लिक करावे व त्यासमोरील टेक्स्ट बॉक्स मध्ये त्याचे कारण नमूद करण्यात यावे.

५. या प्रमाणे संपूर्ण अर्जाची पडताळणी झाल्यानंतर लाभधारकांच्या अर्जास "लाभधारक निवड समितीची" शिफारस असल्यास **"Recommended"** या बटनावर क्लिक करावे, किंवा शिफारस नसल्यास त्याबाबतचे कारण नमूद करून **"Not Recommended"** या बटनावर क्लिक करून अर्ज सबमीट करण्यात यावा. यामध्ये निवड समितीने शिफारस केलेल्या अर्जाची तसेच शिफारस न केलेल्या अर्जाची उपघटक निहाय यादी **Reports** या पेजवर जनरेट होईल.

६. **Approved** यादी हिरव्या रंगामध्ये दिसेल, तसेच **Not Approved** केलेल्या लाभधारकाची यादी लाल रंगामध्ये दिसेल. त्याचप्रमाणे ज्या लाभधारकांच्या कागदपत्राची पडताळणी शिल्लक आहे अशी यादी पांढ्ऱ्या रंगामध्ये दिसेल.

७. लाभधारक निवड समितीने संदर्भिय शासन निर्णय व मार्गदर्शक सुचणे नुसार योजनेमधील १ ते १३ उपघटक निहाय लाभधारकांची अंतिम यादी डाऊनलोड करून त्यावर निवड समितीच्या सदस्यांद्वारे स्वाक्षांकीत करून खालील प्रमाणे सांबंधित महामंडळाच्या प्रक्षेत्राकडे तसेच महामंडळाच्या मुख्य कार्यालयाकडे पाठविण्यात यावी.

८. तसेच उपघटक क्रं. १४ व १५ याकरिता प्राप्त झालेल्या अर्जाची पडताळणी करून त्यांस शिफारस असल्यास अर्जदाराच्या नावासमोर असलेल्या **"Recommended"** या बटनावर क्लिक करावे किंवा शिफारस नसल्यास त्याबाबतचे कारण नमूद करून **"Not Recommended"** या बटनावर क्लिक करावे.

त्यानंतर महामंडळामार्फत मा. आयुक्त पशुसंवर्धन यांच्या अध्यक्षते खालील समिति मार्फत लाभधारक निवड करण्यात येतील.

**पुण्यश्लोक अहिल्यदेवी मेंढी व शेळी विकास प्रक्षेत्राच्या कार्यक्षेत्रामध्ये येणारे जिल्हे खालील प्रमाणे आहेत.**

| अ क्रं | पुण्यश्लोक अहिल्यदेवी मेंढी व शेळी प्रक्षेत्रे | जिल्हयांचे नाव |
|---|---|---|
| १ | पडेगाव, जिल्हा- औरंगाबाद | औरंगाबाद, अहमदनगर, जालना, बुलढाणा |
| २ | बिलाखेड, ता- चाळीसगाव, जिल्हा- जळगाव | जळगाव, नाशिक, धुळे, नंदुरबार |
| ३ | अंबेजोगाई, जिल्हा- बीड | बीड, लातुर, परभणी |
| ४ | मुखेड, जिल्हा- नांदेड | नांदेड, हिंगोली |
| ५ | तीर्थ, ता- तुळजापूर, जिल्हा- उस्मानाबाद | उस्मानाबाद |
| ६ | रांजणी, ता- कवठेमहांकाळ, जिल्हा- सांगली | सांगली, कोल्हापूर, रत्नागिरी, सिंधुदुर्ग |
| ७ | महूद, ता- सांगोला, जिल्हा- सोलापूर | सोलापूर |
| ८ | दहिवडी, ता-माण, जिल्हा- सातारा | सातारा, पुणे, ठाणे, रायगड, पालघर |
| ९ | पोहरा, जिल्हा- अमरावती. | अमरावती, अकोला, वाशिम, यवतमाळ, वर्धा |
| १० | बोंद्री, ता-रामटेक, जिल्हा- नागपूर | नागपूर, भंडारा, गोंदिया, गडचिरोली, चंद्रपूर |

निवड समितीमार्फत अंतिम करण्यात आलेल्या लाभधारकांना लाभ देण्याबाबतच्या पुढील कार्यवाहीबाबत संबधित पशुधन विकास अधिकारी (विस्तार) यांना जिल्हा स्तरावरून सूचना निर्गमित करण्यात येतील.

**<u>७.योजनेचे सर्वसाधारण स्वरूप</u> :**

१. या योजनेमध्ये याआधी लाभ घेतला असल्यास त्यांना परत लाभ घेता येणार नाही.

२. या योजनेअंतर्गत कायमस्वरूपी एका ठिकाणी राहून मेंढी पालन करणारे **(स्थायी)** व स्थलांतर पद्धतीने मेंढीपालन करणारे **(स्थलांतरित)** असे दोन्ही प्रकारचे लाभार्थी योजनेचा लाभ घेऊ शकतील.

३. सदर योजनेअंतर्गत भटक्या जमाती (भज-क) प्रवर्गातील बचतगटांना / पशूपालक उत्पादक कंपन्यांना लाभार्थी म्हणून प्राधान्य देण्यात येईल.

४. कायमस्वरूपी एका ठिकाणी राहून मेंढी पालन करणाऱ्या लाभार्थ्यांना शेड बांधकाम, मोकळया जागेस कुंपण, खाद्याची व पिण्याच्या पाण्याची भांडी, फायबरची बादली आणि इतर साहित्य, जंतनाशके, किटकनाशक औषधे व खनिज विटा, पशुधनाचा विमा, चारा बियाणे व बहुवार्षिक गवत प्रजातींचे ठोंबे / बियाणे या बाबीसाठी अनुदान देण्यात येईल. यापैकी शेड बांधकाम, मोकळया जागेस कुंपण, खाद्याची व पिण्याच्या पाण्याची भांडी, फायबरची बादली आणि इतर साहित्य, जंतनाशके, किटकनाशक औषधे व खनिज विटा याबाबींकरिता थेट लाभ हस्तांतरण पद्धतीने (DBT) लाभ द्यावयाचा आहे. त्यासाठी प्रथम लाभार्थीने या बाबी पूर्णता स्वखर्चाने खरेदी करावयाच्या / उभारावयाच्या असून त्याची स्थानिक पशुधन विकास अधिकारी (विस्तार) यांनी प्रत्यक्ष पडताळणी करून त्याचा फोटो सह अहवाल जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त यांचे मार्फत महामंडळास सादर केल्यानंतर लाभार्थीच्या अनुदानाची रक्कम लाभार्थीचे बँक खात्यात जमा करण्याची कार्यवाही महामंडळामार्फत करण्यात येईल. तसेच चारा बियाणे व बहुवार्षिक गवत प्रजातींचे ठोंबे/ बियाणे याबाबींचा पुरवठा महामंडळाच्या संबंधित प्रक्षेत्रामार्फत लाभार्थीस करणेत येईल व त्यासाठीच्या अनुदानाची रक्कम महामंडळाकडे जमा करणेत येईल.

५. स्थलांतर पद्धतीने मेंढीपालन करणाऱ्या लाभार्थ्यांना खाद्याची व पिण्याच्या पाण्याची भांडी, तंबू, सूती वाघुर, स्थलांतरणाच्या वेळी साहित्य वाहतूक करण्याकरिता खोगीर, फायबरची बादली आणि इतर साहित्य, जंतनाशके, कीटकनाशक औषधे व खनिज विटा आणि मेंढया चारण्यासाठी कुरण भाड्याने घेणे

या बाबींसाठी अनूदान देण्यात येईल. याबाबींकरिता थेट लाभ हस्तांतरण पद्धतीने (DBT) लाभ द्यावयाचा आहे. त्यासाठी प्रथम लाभार्थीने या बाबी पूर्णता स्वखर्चाने खरेदी करावयाच्या / उभारावयाच्या असून त्याची स्थानिक पशुधन विकास अधिकारी (विस्तार) यांनी प्रत्यक्ष पडताळणी करून त्याचा फोटोसह अहवाल जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त यांचे मार्फत महामंडळास सादर केल्यानंतर लाभार्थीच्या अनुदानाची रक्कम लाभार्थीचे बँक खात्यात जमा करण्याची कार्यवाही महामंडळामार्फत करण्यात येईल.

६. या योजने अंतर्गत कायमस्वरूपी ठाणबंद पद्धतीने मेंढीपालन करण्यासाठी निवड करण्यात आलेल्या लाभधारकाने त्यांच्याकडील मेंढ्याकरिता वर्षभरासाठी चाऱ्याची उपलब्धता कशा प्रकारे करून देण्यात येईल, याबाबतचे नियोजन महामंडळाकडे सादर करणे आवश्यक आहे.

७. शेड बांधण्याकरिता स्वत: ची जागा असणे आवश्यक आहे.

८. लाभधारकांनी शेडचे बांधकाम व इतर अनुषंगिक साहित्याची खरेदी केल्यानंतर, संबंधित पशुधन विकास अधिकारी (विस्तार) यांनी लाभधारकांनी बांधकाम केलेल्या शेडची प्रत्येक्ष पाहणी करून त्याचा फोटोसह पडताळणी अहवाल तसेच लाभधारक हिस्याची २५ % रक्कम महामंडळाच्या संबंधित प्रक्षेत्राकडे जमा केल्यानंतर महामंडळाच्या संबंधीत मेंढी व शेळी विकास प्रक्षेत्रामार्फत या योजनेअंतर्गत पुरवठा करावयाच्या मेंढया / नरमेंढे विमाकरून पुरविण्यात यावेत.

९. योजने अंतर्गत पुरवठा करावयाच्या मेंढ्यांची व नरमेंढ्यांची खरेदी महामंडळाकडून त्या त्या वर्षी निश्चित केलेल्या दरानुसार महामंडळाचे अधिकृत पुरावठेदार / थेट शेतकऱ्याकडून तसेच इतर राज्यातुन खरेदी करण्यात येईल.

१०. या योजनेअंतर्गत पैदाशीकरीता वाटप करावयाचे नरमेंढे महामंडळाचे प्रक्षेत्रे, कृषी विद्यापीठे तसेच महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ यांचे पैदास केंद्रे, शासकीय तसेच निमशासकीय संस्थेची प्रक्षेत्रे तसेच केंद्र शासनाच्या संस्था, इतर राज्य शासनाचे पैदास केंद्रे, निंबकर कृषी संशोधन संस्था, फलटण त्याच प्रमाणे राज्यातील खाजगी ब्रीडिंग फार्म, महामंडळाचे अधिकृत पुरवठादार आणि व्यतिगत पशुपालक यांचे कडून महामंडळाने निश्चित केलेल्या दरानुसार खरेदी करून वाटप करण्यात यावे.

११. महामंडळाच्या प्रक्षेत्रापासून ते लाभधारकांच्या ठिकाणापर्यन्त मेंढ्यांच्या वाहतुकीवर होणारा खर्च हा लाभधारकांनी स्वत: करावयाचा आहे.

१२. या योजनेमध्ये कोणत्याही बाबीवरील होणारा अतिरिक्त खर्च हा लाभधारकांनी स्वत: करावयाचा असून, याकरिता कोणतेही शासनाचे अनुदान अनुज्ञेय राहणार नाही.

१३. या योजनेमध्ये बांधावयाच्या शेडचा आराखडा महामंडळामार्फत तयार करण्यात येईल.

१४. चारा बियाणे तसेच गवत प्रजातींचे ठोंबे/ बेणे इत्यादी महामंडळाच्या प्रक्षेत्रामार्फत लाभधारकांस पुरविण्यात यावे. लाभधारकांना स्वत:च्या जमिनीवर किंवा स्वत: ची जमीन नसल्यास भाडे तत्वावर जमीन उपलब्ध करून चाऱ्याची लागवड करणे आवश्यक राहील. याकरिता जमीन भाडे तत्वावर उपलब्ध केल्या बाबतचा करारनामा लाभधारकांनी सादर करणे आवश्यक राहील. (नमूना सोबत जोडण्यात आलेला आहे)

१५. या योजने अंतर्गत पुरवठा करावाचे चारा पिकांचे बियाणे तसेच ठोंबे/ बेने, अझोला कल्चर व मुरघास चा पुरवठा लाभार्थींच्या मागणीनुसार महामंडळाच्या प्रक्षेत्रावरून लाभधारकाने त्याचे हिस्याची २५% रक्कम रु. २७५०/- भरणा केल्या नंतर पुरवठा करण्यात यावा.

१६. या योजनेमधील लाभधारकांना तीन दिवसाचे मेंढी पालन व्यवसायाचे प्रशिक्षण लाभधारकांना जवळ असलेल्या महामंडळाच्या प्रक्षेत्रामार्फत देण्यात यावे.

१७. या योजनेअंतर्गत पुरवठा करण्यात आलेल्या मेंढ्यांना आरोग्य सुविधा (लसीकरण, जंतनाशक औषध पाजणे इ.) नजिकच्या शासकीय / जिल्हा परिषदेच्या पशुवैद्यकीय दवाखान्यामार्फत पुरविण्यात यावे. मेंढयांमध्ये असणारी खनिजांची कमतरता भरून काढण्यासाठी खनिज मिश्रण / मिनरल मिक्सचर ब्रिक्स पुरवठा करण्यात यावे.

१८. या योजनेअंतर्गत पुरवठा करण्यात येणाऱ्या मेंढ्यांना विमा संरक्षण देणे बंधनकारक राहील.

१९. या योजनेअंतर्गत वाटप करण्यात आलेल्या मेंढ्यांपासून लाभधारकांकडील उत्पादित झालेल्या मेंढ्यांची महामंडळास आवश्यकता भासल्यास, लाभधारकांनी मेंढ्यांचा पुरवठा महामंडळास करणे बंधनकारक राहील.

२०. राज्यामध्ये मेंढीपालन व्यवसाय हा स्थलांतरण पद्धतीने केला जातो. स्थलांतरण काळामध्ये मेंढ्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होऊन, मेंढया आजारी पडण्याचे प्रमाण जास्त असेल. यावर मात कण्याकरिता ज्या गावामध्ये जास्त मेंढया आहेत किंवा ज्या मार्गावरून मेंढ्यांचे स्थलांतरण होते, हे ठिकाण किंवा गाव ज्या पशुवैद्यकीय दवाखान्याच्या कार्यक्षेत्रामध्ये असेल त्या पशुवैद्यकीय दवाखान्यामार्फत अशा ठिकाणी दर आठवड्याला भेटी देऊन मेंढ्यांना आरोग्य सुविधा देण्याची व्यवस्था करण्यात यावी. परंतु, याकरिता सदर योजनेअंतर्गत कोणतेही अनुदान अनुज्ञेय राहणार नाही.

२१. सदर योजनेअंतर्गत वाटप करण्यात येणारे मेंढीगट व नरमेंढे तसेच चारा बियाणे / ठोंबे / बेणे यांचे वाटप पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळामार्फत करण्यात येणार असल्याने, नियोजन विभागाच्या शासन निर्णय क्र. डिसीट २३१६ / प्र.क्र.१३३ / का. १४१७, दिनांक ३ मार्च २०१७ या शासन निर्णयातील **परिशिष्ट अ** मध्ये नमूद साधन सामुग्री / वस्तूंच्या यादीतील **अ. क्र. ४** येथील नमूद बाबीमधुन या योजनेसाठी सूट देण्यात आली आहे.

२२. या योजनेअंतर्गत लाभार्थी निवडीमध्ये पुनरावृत्ती होणार नाही, याची दक्षता लाभार्थी निवड समितीने घ्यावी.

२३. या योजनेअंतर्गत सर्व लाभार्थीना आधार कार्ड सोबत संलग्न करण्यात यावे.

<u>प्रकल्प अंमलबजावणी अधिकारी</u>

व्यवस्थापकीय संचालक, पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळ, गोखलेनगर, पुणे हे या योजनेची अंमलबजावणी करतील आणि विभागीय स्तरावर प्रादेशिक सह आयुक्त पशुसंवर्धन व राज्य स्तरावर आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य यांचे या योजनेवर संनियंत्रण असेल.

**<u>बंधपत्र नमूना क्रमांक – १</u>**

**<u>प्रमाणपत्र</u>**

प्रमाणित करण्यात येते की, श्री/श्रीमती. -------------------------------------------- राहणार -------------------तालुका ---------------- जिल्हा ------------------ यांनी वरीलप्रमाणे नमूद केल्यानुसार त्यांच्या कडे सध्या --------------इतक्या मेंढ्या व शेड बांधकामासाठी ------------------ चौ. फुट आकाराची मोकळी जागा उपलब्ध असल्याचे आज दिनांक ----------------------- रोजी केलेल्या प्रत्यक्ष पडताळणी अंती आढळून आले आहे. तसेच त्यांच्याकडील मेंढ्यांचे संगोपन ----------------------- ( स्थलांतरित / स्थायी) पद्धतीने करण्यात येत आहे.

**स्वाक्षरी/-**

**डॉ./श्री.**

सहा. आयुक्त पशुसंवर्धन, तालपसचिव --------------

पविअ, पवैद श्रेणी – १ --------------------------------

सहा. पविअ/ प.प, पवैद श्रेणी – २ -------------------

**<u>बंधपत्र नमूना क्रमांक – २</u>**

**<u>रहिवाशी दाखला</u>**

**(सक्षम प्राधिकारी यांचा)**

दिनांक ------------

श्री/ श्रीमती--------------------------------------------------------------------------------------------------हे मौजे--------------------------- ता.------------------------- जिल्हा----------------------------------------------------------------------------------येथील रहिवाशी आहेत. यांना प्रस्तुत दाखला -------------------------------------------------------------------------------------------- या कामासाठी दिला असे.

सही ---------------------------------

शिक्का ---------------------------------

## <u>बंधपत्र नमूना क्रमांक – ३</u>

## <u>अपत्य दाखला / प्रमाणपत्र</u>

मी श्री/ श्रीमती (अर्जदाराचे नाव) ------------------------------------------------------------------ श्री. ( वडिलाचे / पतीचे नाव)------------------------------------------------------------------------------ ----------- यांचा मुलगा/मुलगी/पत्नी वय -------------- वर्ष------------------ रा.------------------------- ता.- ---------------------- जिल्हा ------------------------------ खालीलप्रमाणे सत्य प्रतिज्ञेवर सांगतो/सांगते की, आणि घोषित करतो/करते की,

1. मी राज्य शासनाच्या राजे यशवंतराव होळकर महामेष योजनेचा लाभ मिळण्यासाठी अर्ज केला आहे.
2. माझ्या आज हयात असलेल्या अपत्यांची एकूण संख्या ---------------- इतकी आहे. त्यापैकी १ मे २००१ नंतर जन्मलेल्या अपत्यांची संख्या ------------------------- इतकी आहे.
3. दिनांक १ मे २००१ नंतर माझ्या एकूण हयात मुलांच्या संख्येत भर पडून ती दोन पेक्षा जास्त झाल्यास मी उपरोक्त योजनेतील लाभास अपात्र ठरेन याची मला जाणीव आहे.

ठिकाण-----------------------
दिनांक-----------------------

**अर्जदाराची सही/ अंगठा**

## <u>बंधपत्र नमूना क्रमांक – ४</u>

### <u>अर्जदाराच्या नावे जमीन नसल्यास (कुटुंबियांपैकी) संमतीपत्र देणाऱ्या व्यक्तीकडून रु. १००/- रुपयाच्या स्टॅम्प पेपरवर करावयाच्या संमतीपत्राचा मसुदा</u>

## <u>“संमती पत्र”</u>

मी खालील सही करणार श्री. / श्रीमती .------------------------------------------------------------- -------------- रा. ------------------- तालुका------------------------- जिल्हा- -------------------------- येथील रहिवाशी असून, माझ्या नावे असलेली सर्वे नं. ----------- गट नं. ---------- मधील ----------- एकर एवढी शेतजमीन, माझे कुटुंबातील सदस्य श्री. श्रीमती ---------------------------------------------- (नातेसंबंध ---------------) यांना “राजे यशवंतराव होळकर महामेष योजने अंतर्गत” मेंढीपालना करिता वापरण्यास माझी पूर्ण संमती आहे, करिता लिहून देत आहे.

**लिहून देणार (संमती देणारा)**

स्वाक्षरी -----------------------------------
श्री / श्रीमती ---------------------------------

**लिहून घेणार (अर्जदार)**

स्वाक्षरी -----------------------------------
श्री / श्रीमती ---------------------------------

**<u>बंधपत्र नमूना क्रमांक – ५</u>**

**<u>भाडेतत्वावर शेतजमीन घेतली असल्यास शेतजमीन मालकासमवेत केलेल्या भाडेकराराचा मसुदा</u>**

**<u>(रु.१००/- स्टॅम्प पेपर वर नोटरी करून)</u>**

## **<u>"भाडे करार"</u>**

मी खालील लिहून देणार श्री. / श्रीमती .-------------------------------------------------------------- -------------- रा. ------------------- तालुका------------------जिल्हा- ----------------येथील रहिवाशी असून, माझ्या नावे असलेली सर्वे नं. गट नं. ---------- मधील ----------- एकर एवढी शेतजमीन, श्री. श्रीमती --------------------------------------------------- रा. --------------------- तालुका ---------------- जिल्हा- ----------------- यांना आज दिनांक ...............पासून पुढील ३ वर्षाकरिता भाडे तत्वावर "राजे यशवंतराव होळकर महामेष योजने अंतर्गत" मेंढीपालना करिता वापरण्यास देण्यात येत आहे. याकरिता वार्षिक रु.-----------/- इतके भाडे आकारणी करण्यात आलेले असून भाडे कराराची रक्कम मला आजरोजी प्राप्त झालेली आहे, करिता भाडेकरार करण्यात येत आहे.

**लिहून देणार (शेतजमीन मालक)**

स्वाक्षरी ------------------------------------

श्री / श्रीमती -------------------------------------

**लिहून घेणार (अर्जदार)**

स्वाक्षरी ------------------------------------

श्री / श्रीमती ----------------------------------

**<u>बंधपत्र नमूना क्रमांक – ६</u>**

## **<u>"स्वयंमघोषणा पत्र"</u>**

मी खालील सही करणार, श्री / श्रीमती (अर्जदाराचे नाव) -------------------------------------------- ---------------श्री (वडिलाचे / पतीचे नाव) ------------------------------------------------ यांचा मुलगा / मुलगी / पत्नी वय ------------ वर्ष, रा ---------------- ता --------------- जिल्हा ------------------, मी राज्य शासनाच्या "**राजे यशवंतराव होळकर महामेष योजनेचा"** लाभ मिळण्यासाठी ऑनलाइन पद्धतीने अर्ज केलेला आहे. सदर अर्जामध्ये भरलेली माहिती तपासून ती खरी असल्याची खात्री केलेली आहे. तसेच मी अर्जासोबत जोडलेल्या रेशन कार्डनुसार माझे कुटुंबातील एकाच सदस्याने या योजनेअंतर्गत लाभासाठी अर्ज केला आहे. तसेच गेल्या तीन वर्षामध्ये पशुसंवर्धन विषयक कोणत्याही योजनेचा लाभ मी किंवा माझ्या कुटुंबातील व्यक्तींनी घेतलेला नाही, त्याचप्रमाणे मी स्व:ता किंवा माझ्या कुटुंबातील कोणताही सदस्य शासकीय / निमशासकीय / स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सेवेत किंवा सेवा निवृत्ती वेतनधारक / शासकीय पदाचा लाभ घेणारा, तसेच राज्य, केंद्र शासन / स्थानिक स्वराज्य संस्थेचे सदस्य / पदाधिकारी / लोकप्रतींनिधी नाही. यामध्ये सादर केलेली माहिती खोटी आढळून आल्यास, मी उपरोक्त योजनेचा लाभ घेण्यास अपात्र ठरेन तसेच कायदेशीर कारवाईस पात्र ठरेन, याची मला जाणीव आहे.

अर्जदाराची सही/ अंगठा

ठिकाण-----------------------

दिनांक-----------------------

## "राजे यशवंतराव होळकर महामेष योजने" अंतर्गत
## निवड करण्यात आलेल्या लाभार्थीकडून घ्यावयाच्या बंधपत्राचा नमूना

मी श्री/श्रीमती/कु.------------------------------------------------------------------ रा-----------------------

ता. ----------------जिल्हा -------------------------- प्रतिज्ञापूर्वक लिहून देतो / देते की, पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळ, यांचे कडून "**राजे यशवंतराव होळकर महामेष योजने**" अंतर्गत ---------------------------- ----------------------------या घटकाचा लाभाकरिता जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त जिल्हा....................... यांचे मार्फत आज दिनांक ------------- रोजी प्रकरण मंजूर झाले असून, त्यानुसार मी शासनाने विहित केलेल्या पध्दतीस अनुसरून मला लागू असलेल्या ७५ % अनुदानावर पायाभूत सोई– सुविधेसह २० मेंढया + १ मेंढानर असा मेंढीगट महामंडळामार्फत पुरवठा करण्याकरिता करण्याची विनंती करीत आहे. सदर योजने अंतर्गत प्राप्त होणाऱ्या मेंढया व नरमेंढ्याचे योग्य तऱ्हेने पालनपोषण करून माझ्या कुटुंबाचे आर्थिक उत्पन्न वाढविणेसाठी मी त्याचा उपयोग करेन.

१. अनुदानावर प्राप्त झालेल्या मेंढी गटातील जनावरे तपासणी करिता पशुसंवर्धन खात्याचे अधिकारी तसेच पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळाच्या अधिकाऱ्यांना आवश्यक त्या वेळेस दाखविण्याची जबाबदारी माझ्यावर आहे व ती मी पार पाडेन.
२. अनुदानावर प्राप्त झालेल्या मेंढी गटातील जनावरे आजारी पडल्यास अथवा पशुवैद्यकाची गरज पडल्यास नजीकच्या पशुवैद्यकीय दवाखान्यात घेऊन जाईल व त्यांच्या सल्ल्यानुसार उपचार करून घेईन.
३. या योजने अंतर्गत प्राप्त झालेली जनावरे तीन वर्षे योग्य रीतीने सांभाळणे व त्यापासून मेंढीपालन व्यवसाय करणे माझेवर बंधनकारक आहे तसेच या दरम्यान विमा काढलेल्या जनावरांच्या विम्याचा बिल्ला कानातून पडल्यास त्याबाबत त्वरित विमा कंपनीस / पशुधन विकास अधिकारी (विस्तार) यांना कळविणे माझ्यावर बंधनकारक आहे, याची मला जाणीव आहे.
४. अनुदानावर प्राप्त झालेल्या मेंढी गटातील जनावरे मृत पावल्यास त्वरित विमा कंपनीस व नजीकच्या पशुवैद्यकीय दवाखान्यास सूचित करून मृत जनावरांचे शव-विच्छेदन करून घेईन व विमा रकमेतून त्याऐवजी मेंढया / नरमेंढे खरेदी करणे माझेवर बंधनकारक आहे, याची मला जाणीव आहे.
५. अनुदानावर प्राप्त झालेल्या जनावरांना साथीच्या रोगापासून संरक्षण मिळणेसाठी नजीकच्या शासकीय पशुवैद्यकीय दवाखान्यातील पशुवैद्यकाचे सल्ल्यानुसार वेळोवेळी लसीकरण करून घेईन.
६. मी अनुदानावर प्राप्त झालेली जनावरे पशुसंवर्धन खात्याच्या अधिकाऱ्यांच्या परवानगी शिवाय विकणार नाही.
७. मी स्व:ता किंवा माझ्या कुटुंबातील कोणताही सदस्य शासकीय / निमशासकीय / स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सेवेत किंवा सेवा निवृत्ती वेतनधारक / शासकीय पदाचा लाभ घेणारा, तसेच राज्य, केंद्र शासन / स्थानिक स्वराज्य संस्थेचे सदस्य / पदाधिकारी / लोकप्रतींनिधी नाही.
८. मला या अथवा तत्सम (मेंढी गट वाटप ) योजनेचा लाभ मिळालेला नाही.
९. या योजनेमध्ये मला देण्यात आलेल्या मेंढया, मी वनक्षेत्रात चराईसाठी सोडणार नाही तसेच वन व पर्यावरणाचा ऱ्हास होणार नाही याची काळजी घेईन.

१०.विहित मुदतीत योजना पूर्ण करण्याची जबाबदारी माझी आहे आणि मी ती वेळेत पूर्ण न केल्यास मला दिलेला लाभ रद्द होऊन प्रतिक्षाधीन यादीतील लाभार्थीस सदरचा लाभ दिला जाईल याची मला जाणीव आहे व असे घडल्यास माझी काहीही तक्रार असणार नाही.

या योजनेबाबत मी अर्जात दिलेली माहिती खरी असून योजनेबाबतच्या सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत. योजनेतील जनावरे परस्पर विक्री केल्यास किंवा प्राप्त झालेल्या अनुदानाचा मी गैर उपयोग केल्याचे आढळून आल्यास मजेवर इंडियन पिनल कोड कलाम ४१५ ते ४६४ पैकी लागू होणाऱ्या कलमानुसार कायदेशीर कारवाई करण्यात येईल, याची मला पूर्ण जाणीव आहे. तसेच मला दिलेल्या अनुदानाची व्याजासह एकरकमी वसूली महसुली पद्धतीने करण्यास माझी संमती आहे.

**लाभार्थीची स्वाक्षरी** .........................

**लाभार्थीचे नाव** ..................................

**साक्षीदार** (स्वाक्षरी , नाव व पत्ता)

१. ................................................................

२. .................................................................

**प्रतीस्वाक्षरीत**

पशुधन विकास अधिकारी (विस्तार)

पंचायत समिती....................

ता...................जिल्हा............

**<u>ऑनलाईन पद्धतीने भरावयाच्या अर्जाचा नमुना</u>**

- आधारकार्ड क्रमांक लिहा (12 digit)
- Type the above number: Enter Captcha
- Press Login
- Upload Image - Photo
- अर्जदाराचे नाव --------------------
- जिल्हा - Select
- तालुका- Select
- गावाचे नाव (मु.पो.) - Select
- पिन कोड - Enter
- आपल्या गावाचा समावेश ज्या पशुवैद्यकीय दवाखान्याच्या कार्यक्षेत्रामध्ये आहे त्या गावाचे नाव
- भ्रमणध्वनी क्रमांक
- अर्जदाराची जन्म तारीख (DD/MM/YYYY) / **वय ----**
- लिंग Select - पुरुष / स्त्री / इतर
- एकूण अपत्यांची संख्या - Select
- दिनांक १ मे २००१ व त्यानंतर माझ्या एकूण जन्माला आलेल्या मुलांची संख्या - Select
- अर्जदाराच्या जातीचा प्रवर्ग
- भटक्या जमातीचा - क
- अर्जदाराची जात - Select
- रेशन कार्ड क्रमांक - Enter
- आधार कार्ड क्रमांक - 100110011011
- अर्जदार अपंग आहे काय ? होय / नाही
- अर्जदाराकडे सद्यस्थितीत मेंढया आहेत काय ? होय / नाही
- असल्यास मेंढ्यांची संख्या – Select
- अर्जदार कायमस्वरूपी एका ठिकाणी राहून मेंढी पालन करणारे (स्थायी) आहेत काय?
- अर्जदार स्थलांतर पद्धतीने मेंढीपालन करणारे (स्थलांतरीत) आहेत काय ?
- अर्जदाराच्या मालकीची शेत जमीन आहे काय? हेक्टर Select आर ------
- बागायत हेक्टर – Select
- जिरायत हेक्टर – Select

- बारमाही/हंगामी सिंचनाकरिता पाण्याचा स्रोत – Select
- सिंचनाकरिता पाणी उपलब्ध असल्याचा कालावधी
- मागील वर्षी पिकविण्यात आलेले चारापिके उदा. मका , ज्वारी, नेपियर बहुवार्षिक पिके व इतर
- मागील वर्षी झालेल्या एकूण चाऱ्याचे उत्पादन (किलो) :(नंबर इंग्लिश मध्ये असणे आवश्यक आहे)
- अर्जदाराकडे मेंढ्यांसाठी वाडा उपलब्ध आहे काय ? होय / नाही, *असल्यास,किती मेंढ्यांसाठी*
- *अस्तित्वातील वाड्याचा प्रकार*
- अर्जदार बचत गटाचा सदस्य आहे काय ? होय / नाही, *बचत गट नाव-------- , नोंदणी क्रमांक*
- अर्जदार पशुपालक उत्पादक कंपनीचा सदस्य आहे काय ? होय / नाही पशुपालक उत्पादक कंपनी नोंदणी क्रमांक
- पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळ येथून प्रशिक्षण घेतले आहे का?

  होय / नाही

<u>अर्जदारास योजनेमधील कोणत्या घटकाखाली लाभ घ्यावयाचा आहे</u>

| | |
|---|---|
| १ | कायमस्वरूपी एका ठिकाणी राहून मेंढीपालन करण्याकरिता पायाभूत सोई – सुविधेसह २० मेंढया + १ मेंढानर असा मेंढीगट ७५% अनुदानावर वाटप करणे **(स्थायी)** |
| २ | स्थलांतर पद्धतीने मेंढीपालन करण्याकरिता पायाभूत सोई – सुविधेसह २० मेंढया + १ मेंढानर असा मेंढीगट ७५% अनुदानावर वाटप करणे **(स्थलांतरीत)** |
| ३ | ज्यांच्याकडे स्वत:चे २० किंवा त्यापेक्षा अधिक परंतु, ४० पेक्षा कमी मेंढया आहेत, अशा लाभार्थ्यांना सुधारित प्रजातीचा १ नरमेंढा ७५% अनुदानावर वाटप करणे. |
| ४ | ज्यांच्याकडे स्वत:चे ४० किंवा त्यापेक्षा अधिक परंतु, ६० पेक्षा कमी मेंढया आहेत, अशा लाभार्थ्यांना सुधारित प्रजातीचा २ नरमेंढे ७५% अनुदानावर वाटप करणे. |
| ५ | ज्यांच्याकडे स्वत:चे ६० किंवा त्यापेक्षा अधिक परंतु, ८० पेक्षा कमी मेंढया आहेत, अशा लाभार्थ्यांना सुधारित प्रजातीचा ३ नरमेंढे ७५% अनुदानावर वाटप करणे. |
| ६ | ज्यांच्याकडे स्वत:चे ८० किंवा त्यापेक्षा अधिक परंतु, १०० पेक्षा कमी मेंढया आहेत, अशा लाभार्थ्यांना सुधारित प्रजातीचा ४ नरमेंढे ७५% अनुदानावर वाटप करणे. |
| ७ | ज्यांच्याकडे स्वत:चे १०० किंवा त्यापेक्षा अधिक मेंढया आहेत, अशा लाभार्थ्यांना सुधारित प्रजातीचे ५ नरमेंढे ७५% अनुदानावर वाटप करणे. |
| ८ | ज्यांच्याकडे स्वत: च्या २० मेंढया व १ मेंढानर अशा एकूण २१ मेंढया किंवा त्यापेक्षा अधिक परंतु, ४० मेंढ्यापेक्षा कमी अशा मेंढ्यांच्या एका ठिकाणी राहून स्थायी स्वरूपाचे मेंढी पालनासाठी पायाभूत सोई-सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी ७५% अनुदान वाटप **(स्थायी)** |
| ९ | ज्यांच्याकडे स्वत: च्या २० मेंढया व १ मेंढानर अशा एकूण २१ मेंढया किंवा त्यापेक्षा अधिक परंतु, ४० मेंढ्यापेक्षा कमी अशा मेंढ्यांच्या स्थलांतरीत स्वरूपाचे मेंढी पालनासाठी पायाभूत सोई-सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी ७५% अनुदान वाटप **(स्थलांतरीत)** |
| १० | ज्यांच्याकडे स्वत: च्या ४० मेंढया व २ मेंढानर अशा एकूण ४२ मेंढया किंवा त्यापेक्षा अधिक अशा मेंढ्यांच्या एका ठिकाणी राहून स्थायी स्वरूपाचे मेंढी पालनासाठी पायाभूत सोई-सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी ७५% अनुदान वाटप **(स्थायी)** |
| ११ | ज्यांच्याकडे स्वत: च्या ४० मेंढया व २ मेंढानर अशा एकूण ४२ मेंढया किंवा त्यापेक्षा अधिक अशा मेंढ्यांच्या स्थलांतरीत स्वरूपाचे मेंढी पालनासाठी पायाभूत सोई-सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी ७५% अनुदान वाटप **(स्थलांतरीत)** |
| १२ | एका ठिकाणी राहून स्थायी स्वरूपाचे मेंढी पालनासाठी संतुलित खाद्य उपलब्ध करून देण्यासाठी ७५% अनुदान वाटप **(स्थायी),**<br>(१०० ग्रॅम प्रती दिन प्रती मेंढी याप्रमाणे माहे एप्रिल ते जुलै या ४ महिन्याच्या कालावधी करिता) |
| १३ | भटकंती करणारे स्थलांतरीत स्वरूपाच्या मेंढी पालनासाठी संतुलित खाद्य उपलब्ध करून देण्यासाठी ७५% अनुदान वाटप **(स्थलांतरीत),**<br>(१०० ग्रॅम प्रती दिन प्रती मेंढी याप्रमाणे जून ते जुलै या २ महिन्याच्या कालावधी करिता ) |

Your application has been submitted successfully. To view the application, please login again.